# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## आस्थापना विभाग

दुरध्वनी क्र:( कार्यालय) ०२४१ - २३४३६२२, २३४५१२७, २३४०५२२
२३४१४५५, २३४६०१०, २३२३०१९

फॅक्स नं.:०२४१ - २३२८८३७

Website www.amc.gov.in E-Mail: amc_ anr @ rediffmail.com

---

जा .क्र. आस्था. १३७० दिनांक:- १६/०५/२०२१

## -: सुधारीत आदेश :-

**विषय:- कोरोना विषाणु ( कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत.**

**संदर्भ:-१) साथ रोग अधिनियम १८९७**

**२) आपत्ती व्यवस्थापन कायदा,२००५**

**३) सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्याकडील अधिसुचना कोरोना २०२० / प्र. क्र. ५८/ आरोग्य ५, दि. १४/०३/२०२०**

**४) प्रधान सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र. क्र.डीएमयु २०२०/ सीआर ९२/ डीएम १ दि. १६/०४/२०२१**

**५) जा. क्र. आस्थापना १२२९ दिनांक ०२/०५/२०२१ रोजीचा आदेश.**

**६) जा. क्र. आस्थापना १३२२ दिनांक १०/०५/२०२१ रोजीचा आदेश.**

**७) मा. शासनाचे आदेश क्र. डीएमयु/२०२०/सीआर.९२/डीआयएसएम-१,दि.१२ मे,२०२१**

**८) जिल्हाधिकारी कार्या.आदेश क्र.डी.सी/कार्या९ब१/१०५७/२०२१दि. १३/०५/२०२१**

**९) जा. क्र. कृषी/गुणी/१६७/२०२१ दिनांक १३/०५/२०२१ रोजीचे पत्र.**

**१०) जा. क्र. आस्थापना १३६७ दिनांक १४/०५/२०२१ रोजीचा आदेश.**

**११) मा. पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांचे कार्या. कडील पत्र क्र.जिविशा/कोरोना २०२१/४०६७ दि. १५/०५/२०२१**

ज्याआर्थी अहमदनगर शहर व राज्यामध्ये कोरोना विषाणूचा (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी साथरोग अधिनियम १८९७ दि. १३ मार्च २०२० पासुन लागु करुन खंड २, ३, ४ मधिल तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमीत केलेली आहे. त्याअन्वये आयुक्त हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हीड-१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्यांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे, त्या कारणासाठी सक्षम प्राधिकारी म्हणुन घोषीत करण्यात आलेले आहेत.

त्याआर्थी उक्त नमुद नियम व आदेशाचे अनुषंगाने मी आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर असे आदेश देतो की, महानगरपालिका शहर हद्दीमध्ये नागरिकांची गर्दी होऊन कोव्हीड-१९ विषाणूचा फ़ैलाव होण्याची शक्यता असल्यामुळे कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणुन, मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार संदर्भ क्र. ५ अन्वये अहमदनगर महानगरपालिका शहर हद्दीमध्ये दि. ०२/०५/२०२१ रोजी रात्री १२:०० वाजल्यापासुन ते दिनांक १०/०५/२०२१ रोजी रात्री १२:०० पर्यंत कडक निर्बंध परिशिष्ट 'अ' व परिशिष्ट 'ब' नुसार लागु करण्यात आलेले होते. तसेच संदर्भ क्र. ६ अन्वये सदर निर्बंध दिनांक १५/०५/२०२१ रोजी सकाळी ०७:०० वाजेपर्यंत वाढविण्यात आलेले आहेत.

संदर्भ क्र.७ अन्वये मा. शासनाने यापुर्वीच्या निर्बंधासह दिनांक १५/०५/२०२१ रोजीचे सकाळी ७.०० वाजेपासून ते दिनांक ०१/०६/२०२१ रोजीचे सकाळी ७.०० वाजेपर्यंत अतिरिक्त निर्बंधासह वाढविण्यात येत आहे, असे नमुद केलेले आहे.

Scanned with CamScanner

संदर्भ पत्र क्रमांक ९ अन्वये कृषी निविष्ठा केंद्रांवर खरेदीसाठी शेतक-यांची गर्दी टाळण्याच्या अनुषंगाने शेतीशी निगडीत असलेले शहर हद्दीतील कृषी सेवा केंद्र चालु ठेवणेबाबत व त्यांच्याशी निगडीत उत्पादन व वाहतुक सकाळी ७.०० ते सायंकाळी ७.०० वाजेपर्यंत चालु ठेवण्यास विनंती केली आहे.

**त्यानुषंगाने संदर्भ क्र.१० चे आदेशान्वये दिनांक १५/०५/२०२१ रोजीचे सकाळी ७.०० वाजेपासून ते दिनांक २४/०५/२०२१ रोजीचे सकाळी ७.०० वाजेपर्यंत परिशिष्ट 'अ' व 'ब' मध्ये नमुदनुसार अशंतः बदल करुन निर्बंध लागु करण्यात आलेले आहेत.**

**तथापी, मा. पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांनी संदर्भ क्र.११ अन्वये पत्र देऊन कृषी विषयक दुकाने ( विक्री दुकाने), माल वाहतुक, भाजीपाला वाहतुक याबाबत नवीन निर्देश दिलेले असल्यामुळे या आस्थापनेवर गर्दी होऊन कोवीड -१९ चे संक्रमण वाढेल त्यामुळे रुग्णांच्या संख्येत वाढ होणार आहे. त्यामुळे संदर्भ क्र. १० चे आदेश रद्द करणेबाबत नमुद केलेले आहे.**

**तसेच दिनांक १५/०५/२०२१ व १६/०५/२०२१ रोजी शहरामध्ये भाजीपाला, किराणा व अत्यावश्यक वस्तु खरेदी विक्री करण्याकरिता नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे कोरोना विषाणू-१९ चा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. यास्तव संदर्भ क्र.१० चा आदेश या आदेशान्वये रद्द करण्यात येत असुन, संदर्भ क्र. ८ अन्वये मा. जिल्हाधिकारी यांनी नमुद केलेल्या बाबीचे निर्बंध लागू राहतील.**

**तरी, कोरोना विषाणूचा (कोव्हीड-१९) वाढता प्रादुर्भाव विचारात घेता, दिनांक १६/०५/२०२१ रोजीचे रात्री १२.०० वाजेपासून ते दिनांक ०१/०६/२०२१ रोजीचे सकाळी ७.०० वाजेपर्यंत खालील प्रमाने परिशिष्ट 'अ' व 'ब' मध्ये नमुदनुसार अशंतः बदल करुन कडक निर्बंध लागु करण्यात येत आहे.**

**"परिशिष्ट अ"**

**सुरु असलेल्या बाबी**

| अ. क्र. | बाबी |
|---|---|
| १ | वैद्यकीय सेवा / औषध दुकाने सुरु राहील. |
| २ | अत्यावश्यक सेवेसाठी पेट्रोल पंप नियमित वेळेनुसार सुरु राहतील. |
| ३ | घरपोहोच गॅस वितरण सेवा सुरु राहील. |
| ४ | सर्व बँका सुरु राहतील. |
| ५ | दुध व दुग्धजन्य पदार्थ विक्री फक्त सकाळी ७ :०० ते ११:०० सुरु राहील. |
| ६ | पशुखाद्य विक्री सकाळी ७ :०० ते ११:०० सुरु राहील. |
| ७ | बी-बियाणे, खते व किटकनाशके दुकाने सकाळी ७. ०० ते ११.०० वाजेपर्यंत सुरु राहील. |

**" परिशिष्ट ब"**

**बंद असलेल्या बाबी**

| अ. क्र. | बाबी |
|---|---|
| १ | किराणा दुकाने / तदनुषंगीक मालाची खरेदी-विक्री करणे बंद राहील. |
| २ | भाजीपाला व फळे बाजार मालाची खरेदी-विक्री करणे बंद राहील. |
| ३ | सर्व खाजगी आस्थापना पुर्णतः बंद राहतील. |
| ४ | अंडी, मटन, चिकन व मत्स्य विक्री बंद राहतील. |
| ५ | शेती निगडीत मशिनरी, पंप इत्यादी दुकाने बंद राहतील. |

कोणतीही व्यक्ती / संस्था / संघटना यांनी उक्त आदेशाचे उल्लघंन केल्यास भारतीय दंड संहिता (४५ऑफ १८६०) च्या कलम १८८ नुसार दंडनिय / कायदेशीर कारवाईस पात्र राहतील.

16/5/2021

**( शंकर गोरे)**
**आयुक्त**
**अहमदनगर महानगरपालिका**

Scanned with CamScanner

प्रति,

१) सर्व प्रभाग अधिकारी, प्र.स.क्र.१,२,३,४ :-

२) सर्व दक्षता पथक :- यांनी आपल्या प्रभागा अंतर्गत येणा-या भागातील उक्त नमुदनुसार दक्षता घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

प्रत - माहितीसाठी सविनय सादर.

१) मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक
२) मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर.
३) मा.जिल्हा पोलीस अधिक्षक, अहमदनगर
४) उपविभागीय पोलीस अधिकारी, शहर भाग
५) कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर

**प्रत :-**

१) उपायुक्त (सा) व (कर) यांना माहितीस.
२) सहाय्यक आयुक्त (सा) व (कर) यांना माहितीस व पुढील कार्यवाहीसाठी.
३) वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांना माहितीस व पुढील कार्यवाहीसाठी.
४) पोलीस निरीक्षक, तोफ़खाना पोलीस स्टेशन, अहमदनगर
५) पोलीस निरीक्षक, कोतवाली, पोलीस स्टेशन, अहमदनगर
६) पोलीस निरीक्षक, एम. आय. डी. सी.पोलीस स्टेशन, अहमदनगर
७) प्र. प्रसिध्दी अधिकारी, प्रसिध्दी विभाग यांना माहितीस व विनामुल्य प्रसिध्दी देण्यात यावे.

Scanned with CamScanner